**पाहिजेत**

दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत. संपर्क - ९६२३४८४४८४

दैनिक

# अट्टल संकेत

ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com

RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३३५ ■ मंगळवार, दि. ८ एप्रिल २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -335 ■ Tuesday, 8 April 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-


## जपानी तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा प्रयत्न - मुख्यमंत्री

मुंबई : जपानचे तंत्रज्ञान शेतीच्या क्षेत्रात आणून कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानावर आधारित १ अब्ज लोकांना मदत करायची आहे. मातीचे पुनरुज्जीवन, मॉडेल फार्म तयार करणे, ग्रीन हाऊस तंत्रज्ञान यावर महाराष्ट्र शासन जपानी एम २ लॅबो संस्थेसोबत काम करणार आहे. विपणन साखळीतील गैरप्रकार कमी करून शेतकऱ्यांना सक्षम करायचे आहे. भारतीय शेतकऱ्यांना शिक्षित करून त्यांना जपानमध्ये रोजगार मिळवून देण्यात येणार आहे. जपानी तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

कृषी क्षेत्राच्या विकासासाठी राज्य शासन विविध निर्णय घेत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करीत शेती समृद्ध करण्यात येत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तंत्रज्ञान शेतीच्या विकासासाठी उपयोगात आणण्यात येत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित धोरण जाहीर केले असून जपान व महाराष्ट्र तंत्रज्ञानाचा उपयोग करून एकत्र काम करण्याचे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

एम २ लॅबो जपान ही सुझुकीची कृषी क्षेत्रातील संस्था असून ही सुझुकीची मुंबई, महाराष्ट्रात नोंदणीकृत झालेली पहिली संस्था आहे. या संस्थेच्या अध्यक्षा युरिको कातो सान यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज भेट घेतली. या भेटीदरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील शेती समृद्ध करण्यासाठी जपानी तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याबाबत संवाद साधला. यावेळी एम २ लॅबो संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी युरिको कातो, मित्र संघटनेचे अध्यक्ष समीर खाळे, एम २ लॅबो भारतचे मुख्य व्यवस्थापकीय अध्यक्ष प्रसून अग्रवाल, देवांग ओझा, एम २ लॅबो जपानचे प्रबंधक मसाको मियाशीता आदी उपस्थित होते.

## वणवा आणि पाणीटंचाईमुळे प्राण्यांची हालअपेष्टा; जळगावात ४ दिवसांत ४ हरणांचा मृत्यू

**जळगाव (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

प्रचंड उन्हाळा, पाण्याची टंचाई आणि मानवी वस्तीशी वाढलेला संपर्क या साऱ्या कारणांनी अमळनेर परिसरात वन्यजीवांना धोका निर्माण झाला आहे. गेल्या चार दिवसांत चार हरणांचा मृत्यू तर, तीन पिल्लं विहिरीत पडल्याची घटना समोर आली आहे.

अमळनेर-टाकरखेडा-जळगाव मार्गावर शासकीय गोदामाजवळ एका अज्ञात वाहनाच्या धडकेत तीन वर्षांच्या हरणाचा जागीच मृत्यू झाला. हृदयद्रावक बाब म्हणजे, अपघातात हरणीचे पोट फाटल्याने तिच्या पोटातील पिल्लू बाहेर आले आणि त्याचाही दुर्दैवी मृत्यू झाला. दोधवद गावात एका आठ महिन्यांच्या काळिवटाचा मृतदेह शेतात आढळून आला. तर, जुनोने परिसरात एक तीन महिन्याचे हरणाचे पिल्लू विहिरीत पडले. ही घटना लक्षात येताच चेतन समाधान धनगर आणि दुर्वा आनंदा धनगर या दोघा तरुणांनी धाडस दाखवत विहिरीत उडी घेऊन त्या पिल्लाचे प्राण वाचवले. या घटनेनंतर वनपाल प्रेमराज सोनवणे, वनरक्षक राम दास वेलसे, सुप्रिया देवरे आणि त्यांच्यासोबत वनम जूर व कर्मचारी पथक घटनास्थळी पोहोचले. जखमी हरणांवर पशुवैद्यकीय दवाखान्यात उपचार करण्यात आले. तर, मृत हरणांचे जंगलात अंत्यसंस्कार करण्यात आले. कडक उन्हामुळे पाण्याच्या शोधात भटकणाऱ्या हरणांची हालअपेष्टा सुरू झाली आहे. जुनोने परिसरात जंगलात आग लागल्याचा संशय असून त्यामुळे हरणांची धावपळ होऊन पिल्लं विहिरीत पडल्याचे मानले जात आहे. या उन्हाळ्यात वन्यजीवांची विशेष काळजी घ्यावी, विहिरी झाकून ठेवाव्यात आणि वन्यजीव आढळल्यास तत्काळ वनविभागाशी संपर्क साधावा.

## इंडिगोच्या विमानात महिलेचा मृत्यू; छत्रपती संभाजीनगर विमानतळावर केले आपत्कालीन लँडिंग

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गेल्या काही दिवसांपासून विमान प्रवासादरम्यान मृत्यू होण्याच्या घटना वाढत चालल्या आहेत. रविवारी रात्री अशाच एका दुर्दैवी घटनेत इंडिगो एअरलाइन्सच्या मुंबई-वाराणसी विमानात प्रवास करणाऱ्या ८९ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला. यानंतर संबंधित विमानाचे छत्रपती संभाजीनगर येथील चिखलठाणा विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करण्यात आले.




सदरील महिला ही उत्तरप्रदेशमधील मिर्झापूर येथील रहिवासी असून सुशीला देवी यांनी मुंबईहून आपला प्रवास सुरू केला होता. मात्र उड्डाणादरम्यान त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. त्यानंतर तातडीने ही माहिती क्रू मेंबर्सनी तात्काळ वैमानिकांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर सुरक्षा व आरोग्याच्या काळजीने विमानाचे छत्रपती संभाजीनगरमध्ये इमर्जन्सी लँडिंग करण्यात आले.

लँडिंगनंतर विमानतळावरील वैद्यकीय पथकाने सुशीला देवी यांची तपासणी केली असता, त्यांचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले. प्राथमिक अंदाजानुसार, त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याचे सांगण्यात येत आहे. या घटनेनंतर प्रवाशांमध्ये काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. विमानात त्या वेळी डॉक्टर उपस्थित होते की नाही, याची माहिती अद्याप समोर आलेली नाही.

## रुग्णालय पैशांसाठी अडल्यामुळेच गेला गर्भवती महिलेचा बळी

**पुणे (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पुण्याचे दिनानाथ मंगेशकर रुग्णालय डिपॉझिटच्या १० लाख रुपयांसाठी अडून बसले. तनिषा भिसे या महिलेवर त्यांनी आवश्यक ते उपचार केले नाही. रक्तस्राव वाढला, तनिषा भिसे यांची तब्येत खालावली. नंतर त्यांना दुसऱ्या रुग्णालयात नेण्यात आले. पण तोपर्यंत वेळ निघून गेली होती. यामुळे सूर्या रुग्णालयाने उपचार केले तरी तनिषा यांना वाचवणे त्यांना शक्य झाले नाही. या प्रकरणात मंगेशकर रुग्णालय पैशांसाठी अडल्यामुळेच गरोदर असलेल्या तनिषा भिसे यांचा मृत्यू झाला; असा अहवाल आहे. तनिषा भिसेंचा मृत्यू हा माता मृत्यू आहे. या प्रकरणात माता मृत्यू अन्वेषण समिती सखोल चौकशी करेल आणि दोषींवर कायद्यातील तरतुदींनुसार कारवाई होईल; अशी माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी दिली.

पुण्यात राहणाऱ्या तनिषा भिसे या गरोदर महिलेची वैद्यकीय फाईल दिनानाथ मंगेशकर रुग्णालयात होती. मंगेशकर रुग्णालयात प्रॅक्टिस करणारे डॉक्टर घैसास तनिषा भिसेंवर उपचार करत होते. डॉक्टरांनीच तनिषा यांना प्रसूतीसाठी २ एप्रिल ही तारीख दिली होती. पण २८ मार्च रोजी रक्तस्राव सुरू झाल्यामुळे तनिषा भिसे यांना घरच्यांनी तातडीने मंगेशकर रुग्णालयात नेले. डॉक्टरांनी प्रसूतीसाठी शस्त्रक्रिया करावी लागेल, असे सांगितले. प्रसूतीसाठी सिझेरियन करण्याआधी रुग्णालयाने १० लाख डिपॉझिट मागितले. भिसे कुटुंबाने तीन लाख रुपये लगेच जमा करण्याची तयारी दाखवली. उर्वरित रकमेची व्यवस्था पुढील तीन ते चार तासांत करतो नाहीतर दुसऱ्या दिवसापर्यंत नक्की करतो अशी ग्वाही भिसे कुटुंबाने दिली. पण रुग्णालय पैशांसाठी अडून बसले. अखेर नातलगांनी तनिषा भिसे यांना सूर्या रुग्णालयात नेले. तिथे रुग्णालयाने उपचार सुरू केले पण अती रक्तस्राव झाल्यामुळे तनिषा यांचा मृत्यू झाला. प्रसूती झाली पण मातेला वाचवणे सूर्या रुग्णालयाला शक्य झाले नाही.

मंगेशकर रुग्णालयाने पैशांना प्राधान्य दिले यामुळेच गरोदर महिलेने जीव गमावला. आता माता मृत्यू अन्वेषण समिती सखोल चौकशी करेल आणि दोषींवर कायद्यातील तरतुदींनुसार कारवाई होईल; अशी माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी दिली.

## सलमान खानचा सिकंदर पोहोचला १०० कोटींच्या घरात!

मुंबई : दरवर्षी ईदच्या दिवशी सलमान खान नवा चित्रपट चाहत्यांच्या भेटीस घेऊन येतो. यंदाही ३० मार्च रोजी सलमान खानचा 'सिकंदर' हा चित्रपट प्रदर्शित केला होता. सुरुवातीला या चित्रपटाबाबत प्रेक्षकांचे मतमतांतरे होत होती. त्यामुळे हा चित्रपट बॉक्स ऑफिस गाजवणार का असा प्रश्न पडला होता. परंतु आता अखेर सलमान खानचा सिकंदर चित्रपट कोटी रुपयांच्या घरी पोहोचला आहे.

सलमान खान चित्रपट चाहत्यांच्या आणि प्रेक्षकांच्या अपेक्षा पूर्ण करू शकला नाही. त्याला संमिश्र प्रतिसाद मिळाला आहे. दरम्यान, बॉक्स ऑफिसच्या कलेक्शननुसार सिकंदरने रिलीजच्या आठव्या दिवशी भारतात १०० कोटींच्या क्लबमध्ये प्रवेश केला आहे. आज सिकंदरने ४.५० कोटी रुपये कमावले आहेत.

## शिर्डीत तीन दिवसीय उत्सवात तीन लाख ७२ हजार लाडू पाकिटांची विक्री

**शिर्डी (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

देशातील नंबर दोनचे श्रीमंत देवस्थान असलेल्या शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थानच्या वतीने दि.५ एप्रिलपासून सुरु असलेल्या श्री रामनवमी उत्सवाची सांगता काल सोमवार दि.७ एप्रिल रोजी ह.भ.प.विक्रम महाराज नांदेडकर यांच्या काल्याच्या कीर्तनानंतर श्री साईसमाधी मंदिरात दहीहंडी फोडून करण्यात आली. या तीन दिवसीय उत्सवात ७४ लाख लाडू प्रसाद पाकिटांची विक्री झाली असल्याची माहिती साई संस्थानच्या वतीने देण्यात आली.

दरम्यान,सोमवारी उत्सवाच्या सांगता दिनी पहाटे ६.५० वाजता श्रींचे मंगलस्नान व शिर्डी माझे पंढरपूर ही आरती मुख्य कार्यकारी भीमराज दराडे व त्यांच्या सुविधा पत्नी वैशाली दराडे यांच्या हस्ते करण्यात आली. सकाळी ७ वाजता साई संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर व त्यांच्या सुविध्य पत्नी वंदना गाडीलकर यांनी रुद्राभिषेक पूजा केली. श्री राम नवमी उत्सवाच्या सांगता दिनी सकाळी १० वाजता ह.भ.प. विक्रम महाराज नांदेडकर यांचे गोपाळकाला कीर्तनाचा कार्यक्रम पार पडला. गोरटे यांच्या काल्याच्या कीर्तनानंतर समाधी मंदिरात श्री साईबाबांचे समकालीन भक्त तात्या पाटील होते यांचे वंशज परिवारातील सदस्य श्री पारेश्वर बाबासाहेब होते यांच्या हस्ते दहीहंडी फोडण्यात आली.

यावेळी ह.भ.प.विक्रम महाराज नांदेडकर यांचा संस्थानच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपमुख्य कार्यकारी अधिकारी भीमराज दराडे, प्रशासकीय अधिकारी संदीप कुमार भोसले, मंदिर प्रमुख विष्णू थोरात,जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके,मंदिर पुजारी,शिर्डी ग्रामस्थ व साई भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यानंतर दुपारी १२.१० वाजता श्रींची मध्यान्ह आरती झाली.दुपारी १ ते ३ या वेळेत द गोल्डन व्हॉइस स्टुडिओज मुंबई यांचा साई भजन संध्या कार्यक्रम दुपारी ३.३० ते ५ .३० या वेळेत श्रीमती पुजा राठोर, जयपुर यांचा साई भजन संध्या कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. उत्सव कालावधीत पार पडलेल्या सर्व कार्यक्रमांना श्रोत्यांकडून प्रतिसाद मिळाला.

संस्थानच्या वतीने या कलाकारांचा सत्कार करण्यात आला.तर रात्री १० वाजता शेजारती झाली.श्री रामनवमी उत्सव यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संस्थानचे तदर्थ समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा प्रधान न्यायाधीश श्रीमती अंजू शेंडे तदर्थ समितीचे सदस्य तथा जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया,मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर,उपमुख्य कार्यकारी अधिकारी भीमराज दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासकीय अधिकारी संदीप कुमार भोसले, प्रज्ञा महांडुळे, विश्वनाथ बजाज,मुख्य लेखाधिकारी मंगला वराडे, वैद्यकीय संचालक डॉ.शैलेश वक,कार्यकारी अभियंता भिकन दाभाडे,संरक्षण अधिकारी रोहिदास माळी सर्व विभाग प्रमुख व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## उद्योग नगरी वाहतूकीच्या विळख्यात

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिल्ह्यातील प्रमुख औद्योगिक केंद्र वाळूज उद्योगनगरी आज गंभीर वाहतूक समस्येच्या विळख्यात सापडली आहे. या नगरीमध्ये जवळपास ६ हजार लहान-मोठे उद्योग कार्यरत असून बजाज, व्हेरॉक, इनड्युरन्स, गरवारे, वोकार्ट, मायलॉन यांसारख्या आघाडीच्या कंपन्या येथे उत्पादन करतात. येथे दहा लाखांहून अधिक कामगार रोज कामासाठी ये-जा करतात.

वाळूजला छत्रपती संभाजीनगर शहराशी जोडणारा फक्त एकच मुख्य रस्ता असल्याने या मार्गावर प्रचंड प्रमाणात वाहनांची वदर्ळ होत असते.

दुचाकी, तीनचाकी, चारचाकी, मालवाहतूक ट्रक, खासगी ट्रॅव्हल्स, एमएसआरटीसी बसेस अशा सुमारे ५० हजार वाहने दररोज या मार्गावरून धावतात. विशेषतः महावीर चौक ते नगर नाका आणि पुढे वाळूज गावापर्यंतचा रस्ता गंभीर वाहतूक कोंडीने ग्रस्त आहे. ओयासिस चौक हा या मार्गावरील सर्वाधिक गर्दीचा भाग असून येथे वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत घेऊन वाहन चालवावे लागते.

अरुंद रस्ता, बेशिस्तपणे उभ्या असलेल्या मालवाहनांमुळे आणि अतिक्रमण केलेल्या टपऱ्यांमुळे रस्ता आणखी संकुचित झाला आहे. त्यातच अपे रिक्षांची बेसुमार संख्या, त्यांच्या अनियमित प्रवासी भाड्यांच्या लूटमारमुळे आणि पादचाऱ्यांना रस्ता ओलांडताना होणाऱ्या अडचणींमुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे.

या गंभीर समस्येमुळे वाळूजमधील नागरिक आणि कामगारांचे जीवनमान ढासळले असून, वेळेचा अपव्यय, अपघातांचा धोका आणि मानसिक तणाव या गोष्टी वाढत चालल्या आहेत. नागरिक आणि स्थानिक उद्योजक वर्गाने प्रशासनाकडे वारंवार या समस्येकडे लक्ष वेधले असून, यावर उपाय म्हणून.

- सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिक वापर
- वाहतूक नियमांचे काटेकोर पालन
- पर्यायी मार्गांची उभारणी
- रस्त्यांचे रुंदीकरण आणि अतिक्रमण हटविणे
- यावर तातडीने काम करण्याची गरज आहे.

स्थानिक प्रशासन, राज्य शासन तसेच केंद्र शासनाने यावर तातडीने लक्ष घालून वाळूज उद्योगनगरीस सुस्थितीत वाहतूक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

## मध्यप्रदेशात तोतया डॉक्टरने घेतला ७ जणांचा जीव

### युपीच्या प्रयागराज येथून बनावट डॉक्टरला अटक

दामोह : मध्यप्रदेशच्या दामोह येथे हृदयरोग्यांवर शस्त्रक्रिया करून ७ जणांचा जीव घेणाऱ्या तोतया डॉक्टरला अखेर उत्तरप्रदेशच्या प्रयागराज येथून अटक करण्यात आली आहे. नरेंद्र यादव असे या बोगस डॉक्टरचे नाव असून तो गेल्या काही दिवसांपासून फरार होता. बनावट डॉक्टर नरेंद्र विक्रमादित्य यादव याने आपण लंडनचे सुप्रसिद्ध कार्डियोलॉजिस्ट डॉ. एन. जॉन कॅम असल्याचे सांगितले होते. तो जानेवारी महिन्यात दामोहच्या रूग्णालयात रुजू झाला होता. त्याने किमान १२ ते १५ शस्त्रक्रिया केल्या होत्या. यातील ७ जणांचा मृत्यू झाला. त्यानंतर फेब्रुवारीत तो गायब झाला. सखोल तपासानंतर असे लक्षात आले की, नरेंद्र यादव याने युनायटेड किंग्डममधील सुप्रसिद्ध हृदयविकार तज्ज्ञ प्रा. जॉन केम यांच्या नावाचा दुरूपयोग केला. प्रा. केम यांनी इमेलद्वारे तसेच सोशल मीडियावर त्यांच्या नावाचा दुरूपयोग केला जात असल्याचे लक्षात आणून देत या बोगस डॉक्टरविषयी इशारा दिला होता.

यादवच्या विरोधात दाखल गुन्ह्यात नमूद केल्यानुसार या बोगस डॉक्टरची मध्य प्रदेश वैद्यकीय परिषदेत कोणतीही वैध नोंदणी नाही. त्याच्या कागदपत्रांवर नोंदणी नाही आणि आंध्र प्रदेश वैद्यकीय परिषदेच्या अधिकृत पोर्टलवरही त्याची नोंदणी उपलब्ध नाही. रुग्णालयाने त्याला नोंदणी करणाऱ्या संस्थेचे म्हणून दाखवले. पण ती कागदपत्रे संशयास्पद होती. त्याला जिल्हाधिकाऱ्यांनी नियुक्त केलेल्या वैद्यकीय पथकानेही दुजोरा दिला आहे. रुग्णालयाने नंतर अधिकाऱ्यांना सांगितले की डॉ., नरेंद्र यादव उर्फ कॅम रुग्णालय सोडून गेला.

पोलिसांनी बनावट कागदपत्रे तयार करणे, फसवणूक, लुबाडणे आणि गुन्हेगारी कटाशी संबंधित भारतीय दंड संहिता कलम ३१५ (४), ३३८, ३३६ (३), ३४० (२) आणि ३ (५) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.बोगस डॉक्टरने कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठ किंवा परिषदेच्या अधिकृत सत्यापन क्रमांकांशिवाय बनावट डिग्री प्रमाणपत्रे आणि नोंदणी कागदपत्रे सादर केली होती. त्यामुळे रूग्णालय व्यवस्थापकही तपासाच्या रडारवर आहेत. दमोह जिल्ह्यातील दीपक तिवारी यांनी या प्रकरणाची तक्रार राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडे केली. त्यात म्हटले आहे की, ७ रूग्णांचा मृत्यू झाला आहे. मृत रूग्णांच्या कुटुंबियांना समजावून सांगून त्यांच्याकडून मोठी फी वसूल केली आणि शवविच्छेदन न करता मृतदेह नातेवाईकांना परत दिले गेले. एकूण मृत्यूंच्या संख्येबाबत सखोल चौकशी करावी. आरोपी डॉक्टर आणि रुग्णालयाच्या व्यवस्थापनावर हत्येचा गुन्हा दाखल करावा. तसेच रुग्णालयाची नोंदणी रद्द करावी असे त्यांनी म्हंटले आहे.

## समर्थांची साधना

समर्थ रामदास स्वामी यांचा जन्म एप्रिल, इ.स. १६०८ साली, रामनवमीला, जालना जिल्ह्यातील जांब, महाराष्ट्र येथे झाला. १६८२ साली त्यांनी देहत्याग केला. समर्थ रामदास स्वामी यांचे मुळ नाव 'नारायण सूर्याजीपंत कुलकर्णी' (ठोसर) होते. त्यांच्या वडीलांचे नाव सूर्याजीपंत ठोसर हे होते. समर्थ रामदास स्वामी यांचे उपास्य दैवत श्रीराम आणि हनुमंत होते. समर्थ रामदासांनी परमार्थ, स्वधर्मनिष्ठा आणि राष्ट्रप्रेम यांचा प्रसार संपूर्ण महाराष्ट्रात करुन समाज संघटनाचे कार्य केले. ते छत्रपती शिवाजी महाराजांचे गुरु होते. समर्थ रामदास स्वामी यांनी बरेच समाज प्रबोधनपर रचना केल्या त्यातील काही रचना दासबोध, श्रीराम स्तुती, हनुमान स्तुती, मनाचे श्लोक, करुणाष्टके, मारुती स्तोत्र या होत. राष्ट्रगुरु समर्थ रामदासस्वामी यांची 'जय जय रघुवीर समर्थ' ही घोषणा सर्वांना ठाऊकच असेल. कठोर साधनेमुळे लहान वयातच त्यांना प्रभु श्रीरामाचे दर्शन झाले.

नारायण म्हणजेच आपले समर्थ रामदासस्वामी लहान असतांना अत्यंत बुद्धीमान होते. लहानपणापासूनच त्याचे लक्ष इतर गोष्टींपेक्षा देवभक्तीकडे होते. त्याची श्रीरामावर फार भक्ती होती. त्याचा जास्तीतजास्त वेळ परमेश्वराच्या चिंतनातच जात असे. चिंतनानंतर त्याला असे आढळून आले की, खरे ज्ञान होण्यासाठी आपणास गुरूंकडून उपदेश मिळाला पाहिजे. तेव्हा नारायणाने आपले वडीलबंधू गंगाधर यांना उपदेश देण्याची विनंती केली. नारायणाची ही विनंती ऐकून ते म्हणाले, अजून तू लहान आहेस. तुझे खेळण्याचे वय असल्यामुळे थोडा मोठा झालास की, उपदेश देईन. या बोलण्याने तो हिरमुसला झाला नि गावातल्या मारुतीरायाच्या देवळात एका आडोशाला मारुतिरायाने गुरुपदेश दिल्याविना बसल्या जागेवरून उठायचे नाही, असा निश्चय करून ध्यान करत बसला. त्या वेळी प्रत्यक्ष प्रभु श्रीराम चंद्राने प्रगट होऊन नारायणाला 'श्रीराम जय राम जय जय राम ।' या मंत्राचा उपदेश दिला. गुरूंचा उपदेश मिळाल्याने नारायण आनंदित झाला आणि आपला बहुतेक वेळ परमेश्वराच्या चिंतनात घालवू लागला.

त्याचे हे श्रीरामाचे वेड त्याच्या आईला ठाऊक होते. श्रीरामाच्या भक्तीत पूर्णपणे विरघळून गेलेल्या नारायणाचे मन संसारात रमावे यासाठी तिने त्याचे लग्न करायचे ठरवले. त्या वेळी त्याचे वय होते अवघे बारा वर्षे. आई म्हणाली की, 'शुभमंगल सावधान' होईपर्यंत माझे ऐक. आईची आज्ञा म्हणून बाल नारायण लग्नासाठी मंडपात येऊन उभा राहिला. मनातील श्रीरामाची मूर्ती स्वस्थ बसू देईना. अक्षता पडायच्या वेळेला जेव्हा ब्राह्मणांनी 'शुभ मंगल सावधान'चा गजर केला, त्या क्षणी त्याने लग्नमंडपातून धूम ठोकली. पळत पळत तो नाशिकच्या पंचवटीत आला. तिथल्या श्रीरामाच्या मूर्तीचे डोळे भरून दर्शन घेतले आणि तेथूनच जवळ असलेल्या दोन मैलांवरच्या टाकळी या गावी गेला. पुढे त्यांनी गोदावरी आणि नंदिनी नद्यांच्या संगम स्थानी राहून बारा वर्षे तपश्चर्या केली. सूर्योदयापासून सूर्य मध्यान्ही येईपर्यंत गोदामाईच्या कमरभर पाण्यात उभे राहून तेरा कोटी श्रीरामनामाचा त्रयोदशाक्षरी जपाचा संकल्प पूर्ण केला. छोटा नारायण आता नारायण न रहाता ईश्वरासारखा तेजस्वी, दैदीप्यमान पुरुष झाला होता. छातीपर्यंत दाढी, पायात खडावा, भगवे वस्त्र अणि प्रत्येक श्वासागणिक श्रीरामाचे नाम. भोवतालचे सर्व लोक त्यांना समर्थ रामदासस्वामी म्हणून ओळखू लागले होते. दोन तपे साधनेत घालवल्यामुळे प्रत्यक्ष श्रीरामाचे मार्गदर्शन त्यांना पदोपदी होत होते. पुढे प्रभु श्रीरामाच्या आज्ञेवरूनच समर्थांनी श्रीरामाच्या उपासनेचा संप्रदाय चालू केला, तोच समर्थ संप्रदाय. 'मरावे परी कीर्तिरूपे उरावे' असे त्यांनी म्हटले ते खरे करून दाखवले. समर्थ देहरूपाने गेले; पण आपल्या शिकवणीमुळे ते अजरामर झाले. समर्थांनी 'दासबोध' नावाचा ग्रंथ लिहिला. त्यामध्ये सर्वांनी कसे वागावे, ईश्वर भक्ती म्हणजे साधना कशी करावी, हे सांगितले आहे. या लेखातून साधना म्हणजे काय, हे कळलेच असेल. या कलियुगात सोप्यात सोपी साधना नामसाधना सांगितली आहे. प्रत्येकाने आपल्या कुलदेवतेचे नामस्मरण करावे. कुलदेवतेच्या नामस्मरणामुळे आपली आध्यात्मिक उन्नती होते.

## कुडाळात गळफास घेऊन पोलीस कॉन्स्टेबलची आत्महत्या

सिंधुदुर्ग : कुडाळ पोलीस ठाण्यात कॉन्स्टेबल पदावर कार्यरत असलेल्या सुरज अनंत पवार (३१, रा. मळगाव-कुंभार्लीवाडी, ता. सावंतवाडी, सध्या रा. रामेश्वर प्रसाद कॉम्प्लेक्स, केळबाईवाडी, कुडाळ) याचा मृतदेह ते राहत असलेल्या रामेश्वर प्रसाद कॉम्प्लेक्स मधील फ्लॅट मध्ये सिलिंग फॅनला गळफास घेतलेल्या अस्वस्थेत आढळून आला. तपासाअंती सूरज यांनी आत्महत्या केली असल्याची माहिती पोलिसांनी दिली. आज दुपारी पावणेचार पूर्वीची हि घटना असल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलीस ठाण्यातून मिळालेल्या माहितीनुसार, सुरज अनंत पवार हे कुडाळ पोलीस ठाण्यात कॉन्स्टेबल पदावर कार्यरत होते. अलीकडेच काही महिन्यांपूर्वी आवळेगाव आऊटपोस्ट येथून ते कुडाळ पोलीस ठाण्यात हजर झाले होते. ते कुडाळमधील रामेश्वर प्रसाद कॉम्प्लेक्समध्ये एकटेच राहत होते. आज दुपारी त्याच्या मित्राच्या मोबाईल वर त्यांनी 'तुला कुडाळला यावेच लागेल, मी जीवन संपवीत आहे' अशा आशयाचा मेसेज टाकला. त्या मित्राने याची कल्पना त्याचा मळगाव येथील भावाला दिली. ते तातडीने कुडाळला आले. तो राहत असलेल्या फ्लॅटवर गेले असता बाहेरून लॅच लावलेले होते. परंतु किल्ली बाहेर ठेवलेली होती. त्यांनी दरवाजा उघडून आत प्रवेश केला असता सुरज पवार पंख्याला दोरीने गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आले. त्यांना रुग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. सुरज यांच्या आत्महत्येचे नेमके कारण मात्र समजू शकले नाही. सूरज हे मळगाव-कुम्भार्लीवाडी येथील मूळ रहिवाशी होते. त्यांच्या त्या घरी आई, भाऊ, वहिनी आणि पुतण्या असा परिवार आहे. तर, त्यांच्या पश्चात पत्नी आणि तीन वर्षांचा मुलगा आहे. सुरज पवार यांच्या या जाण्याने कुडाळ पोलीस ठाण्यातील त्यांच्या सहकाऱ्यानी हळहळ व्यक्त केली.

# एका अर्थी राष्ट्रसंघाचे एक उपांग!

## (आंतरराष्ट्रीय आरोग्य दिन विशेष)

डब्ल्यूएचओच्या व्यापक आदेशात सार्वभौमिक आरोग्य सल्ला, सार्वजनिक आरोग्याच्या जोखमीवर देखरेख, आरोग्य आपत्कालीन प्रतिक्रियांचे समन्वय, मानवी आरोग्य प्रसार यांचा समावेश आहे. डब्ल्यूएचओने सार्वजनिक आरोग्यासाठी केलेल्या अनेक कामांमध्ये प्रमुख भूमिका बजावली आहे, विशेषतः रोग निर्मूलन, पोलिओचे निर्मूलन आणि इबोला, कोरोना लसीचा विकास आदी. त्याच्या सद्य प्राधान्यांमध्ये संसर्गजन्य रोगांचा समावेश आहे, त्यात एचआयव्ही- एड्स, इबोला, मलेरिया आणि क्षयरोग यांची वर्णी लागते. आणखी सविस्तर माहितीसाठी वाचा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी यांचा हा लेखनप्रपंच...

डब्ल्यूएचओ सरकारी आरोग्य धोरणाला दोन उद्दीष्टांसह संबोधित करतो- पहिली गोष्ट म्हणजे, आरोग्य समानता वाढवणारी, गरीब-समर्थक, लिंग-प्रतिसाद देणारी आणि मानवी हक्कांवर आधारित दृष्टीकोन एकत्रित करणारी धोरणे, कार्यक्रमांद्वारे आरोग्याच्या मूलभूत सामाजिक आणि आर्थिक निर्धारकांना संबोधित करणे होय. तर दुसरे म्हणजे, आरोग्यदायी वातावरणाला चालना देणे, प्राथमिक प्रतिबंध तीव्र करणे आणि आरोग्यास होणाऱ्या पर्यावरणाच्या धोक्यांमागील मूळ कारणांवर लक्ष केंद्रित करणे यासाठी सर्व क्षेत्रातील सार्वजनिक धोरणांवर परिणाम५ करणे होय.




डब्ल्यूएचओच्या तेरापैकी- ओळखल्या गेलेल्या पॉलिसी क्षेत्रांपैकी उर्वरित दोन डब्ल्यूएचओच्या भूमिकेशी संबंधित आहेत- जागतिक आरोग्य अजेंडा पुढे नेण्याच्या दृष्टीने डब्ल्यूएचओचे आदेश पार पाडण्यासाठी नेतृत्व, शासन, गती, भागीदारी व देश, संयुक्त राष्ट्र प्रणाली आणि इतर भागधारकांसह सहकार्य म जबूत करणे असते. डब्ल्यूएचओला एक लवचिक शिक्षण संस्था म्हणून विकसित करणे, टिकवून ठेवणे आणि त्याचे कार्य अधिक प्रभावीपणे पार पाडण्यास सक्षम करणे महत्त्वाचे आहे. विश्व स्वास्थ्य संस्था ही आंतरराष्ट्रीय सार्वजनिक आरोग्याच्या क्षेत्रात सुसंवादाचे कार्य करणारी संयुक्त राष्ट्रांची एक विशेष संस्था आहे. ती दि.७ एप्रिल १९४८ रोजी स्थापन झाली. स्वित्झर्लंडम धील जिनिव्हात मुख्यालय असणाऱ्या या संस्थेने एका अर्थी राष्ट्रसंघाचे एक उपांग असणाऱ्या आरोग्य संस्थेचे कार्य पुढे चालविले जात आहे.

आंतरराष्ट्रीय संघटना सन १९४५च्या संयुक्त राष्ट्रांच्या परिषदेदरम्यान चीनच्या प्रतिनिधी स्झमिंग स्झे यांनी नॉर्वे ब्राझीलच्या प्रतिनिधींना नवीन संयुक्त राष्ट्रांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय आरोग्य संस्था तयार करण्याचे काम दिले. या विषयावर ठराव मंजूर करण्यात अपयशी ठरल्यानंतर परिषदेचे सरचिटणीस अल्जर हिस यांनी अशी संघटना स्थापन करण्याच्या घोषणेचा वापर करण्याची शिफारस केली. स्झे आणि इतर प्रतिनिधींनी आरोग्याविषयी आंतरराष्ट्रीय परिषद बोलाविण्याची घोषणा केली. जागतिक आरोग्य संघटनेच्या घटनेवर संयुक्त राष्ट्रांच्या सर्व ५१ देशांनी आणि इतर १० देशांनी दि.२२ जुलै १९४६ रोजी स्वाक्षरी केली. अशाप्रकारे ही संयुक्त राष्ट्रांची पहिली विशेष संस्था बनली. त्याची स्थापना दि.७ एप्रिल १९४८ रोजी पहिल्या जागतिक आरोग्य दिनावर औपचारिकपणे अंमलात आणली. नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्कालीन परिस्थितीतील जागतिक आरोग्य संघटनेचे मुख्य उद्दीष्ट हे आहे, की जीवनाचे टाळण्यासारखे नुकसान, रोग आणि अपंगत्वाचे ओझे कमी करण्यासाठी देश आणि इतर भागधारकांशी समन्वय साधणे. तब्बल १९४ सदस्य देशांच्या प्रतिनिधींनी बनलेल्या डब्ल्यूएचए एजन्सीची सर्वोच्च निर्णय घेणारी संस्था म्हणून ती काम करते. ३४ आरोग्यतज्ञ कार्यकारी मंडळाची निवड करून त्यांना सल्ला देते. डब्ल्यूएचए अधिवेशन महासंचालक निवडणे, ध्येय, प्राधान्यक्रम, बजेट आणि क्रियाकलाप मंजूर करण्यास जबाबदार असतो. विद्यमान महासंचालक टेड्रोस अॅधानम, माजी आरोग्यमंत्री आणि इथिओपियाचे परराष्ट्रमंत्री यांनी दि.१ जुलै २०१७ रोजी पाच वर्षांचा कार्यकाळ सुरू केला. दि.२३ जून १८५१ रोजी आयोजित आंतरराष्ट्रीय स्वच्छता संमेलन, डब्ल्यूएचओचे पहिले पूर्ववर्ती होते. सन १८५१ ते १९३८ या काळात झालेल्या १४ परिषदांच्या आंतरराष्ट्रीय मालिका, आंतरराष्ट्रीय स्वच्छता संमेलने यांनी कॉलेरा, पिवळा ताप यांसारख्या अनेक रोगांचा सामना करण्याचे काम केले. संमेलन यशाच्या परिणामी, पॅन-अमेरिकन स्वच्छता विभागाने आणि आंतरराष्ट्रीय कार्यालय- डी स्वच्छता पब्लिक लवकरच स्थापन करण्यात आले. सन १९२० मध्ये लीग ऑफ नेशन्सची स्थापना झाली, तेव्हा त्यांनी आरोग्य संघटनेची स्थापना केली.




- संकलन व शब्दांकन -
श्री एन. के. कुमार
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

दि.५ मे २०१४ रोजी डब्ल्यूएचओने जाहीर केले, की पोलिओचा प्रसार हा जागतिक आरोग्य आणीबाणी आहे- आशिया, आफ्रिका आणि मध्य पूर्व या रोगांचा प्रादुर्भाव विलक्षण मानला गेला. दि.८ ऑगस्ट २०१४ रोजी डब्ल्यूएचओने जाहीर केले, की इबोलाचा प्रसार हा सार्वजनिक आरोग्य आणीबाणी आहे; ते गिनियामध्ये सुरू झाले. असा विश्वास होता, की हा उद्रेक जवळपासच्या इतर देशांमध्ये जसे की लाइबेरिया आणि सिएरा लिओनमध्ये पसरला होता. दि.३० जानेवारी २०२० रोजी डब्ल्यूएचओने कोरोना- कोविड-१ हा साथरोग सर्व देशभर किंवा खंडभर असलेला सार्वजनिक आरोग्याची आणीबाणी म्हणून आंतरराष्ट्रीय चिंता जाहीर केली, हे येथे वाखाणण्याजोगेच म्हणावे लागेल!

!! विश्व स्वास्थ्य संस्था स्थापना दिनाच्या सर्वांना निरामय हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# नवकार दिवस ९ एप्रिल : जितो आणि नवकार फाऊंडेशनकडून आध्यात्मिक एकतेचा जागर




छत्रपती संभाजीनगर, दि. ७ (प्रतिनिधी) - देशभरात ९ एप्रिल २०२५ रोजी नवकार दिवस साजरा केला जाणार असून, या दिवशी विश्व नवकार महामंत्राचा सामूहिक जप होणार आहे. हा उपक्रम जितो आणि नवकार फाऊंडेशनच्या संयुक्त पुढाकाराने आयोजित करण्यात आला असून, त्यामागे आत्मशुद्धी, विश्वशांती आणि सामाजिक एकतेचा उद्देश आहे.

सकाळी ७ ते ९.३० या वेळेत सरस्वती भवन महाविद्यालयात होणाऱ्या या भव्य कार्यक्रमात नवकार महामंत्राच्या गजरात भक्तीगीते, दीपप्रज्वलन आणि साध्वीजींचे आशीर्वाद मिळणार आहेत. भारतासह विविध देशांतील संस्था, धर्मगुरू, कलाकार, उद्योजक आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

या दिवशी नवकार फाऊंडेशनकडून २७ नवकार कलशांच्या लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले आहे. यासोबतच नवकार महामंत्रावर आधारित विशेष प्रदर्शनही पाहायला मिळणार आहे. नवकार फाऊंडेशनने आजपर्यंत ५०० कोटी नवकार जपांची नोंद केली असून, त्यांनी या कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य दिले आहे. यामध्ये वैजापुर, पैठण, गंगापूर, लासुर आणि सिललोड येथील सकल जैन समाज सहभागी होणार आहे.

या अध्यात्मिक जागृतीसाठी जितोने सर्व नागरिकांना आपल्या कुटुंबासह सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. नवकार जपाच्या माध्यमातून विश्वविक्रम साध्य करण्याचा संकल्प यावेळी केला जाणार आहे. नोंदणीसाठी व अधिक माहितीसाठी www.navkardivas.jitoworld.org या संकेतस्थळाला भेट द्या. यासाठी नवकार फाउंडेशन प्रकल्प प्रमुख रवी मुगदिया, अनिल कुमार संचेती, विलास साहूजी, संजय संचेती, विनोद बोकडिया, राजेश मुथा, अजित जैन, रवी लोढा, निलेश जैन, पंकज साकला, हितेश कांकरिया, प्रकाश कोचेटा, अभिजीत हिरप, पियुष कासलीवाल, विकास रायमाणे, अमित काला, संतोष पापडीवाल, समीर ठोळे परिश्रम घेत आहेत.

**नवकार प्रदर्शन आणि चॅनलचे उद्घाटन** - यावेळी नवकार फाऊंडेशनतर्फे सुरू करण्यात आलेल्या चॅनलचे आणि नवकार प्रदर्शनचे उद्घाटन सकाळी पावणे नऊ वाजता सर्व साधू-साध्वीच्या यांच्या उपस्थित होणार आहे.

# महागड्या उपचारांबद्दल सर्वसामान्य मात्र नाराज

राज्यातील सरकारी, खासगी, धर्मादाय, कॉर्पोरेट्स अशा रुग्णालयांमधील रुग्णांना भेडसावणाऱ्या समस्या मोठ्या प्रमाणावर उघड झाल्या आहेत. या सर्व घटनेवर बोलताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याकरिता राज्य सरकारच्या वतीने समिती स्थापन केली आहे. ही समिती या संपूर्ण घटनेची सविस्तर चौकशी करेल आणि त्यानंतर आपला अहवाल राज्य सरकार पुढे सादर करील. त्यातून जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर राज्य सरकार कारवाई देखील करेल अथवा चौकशीत जर काही निष्पन्न झाले नाही, तर कोणावर कारवाई होणार देखील नाही. तथापि या घटनेच्या निमित्ताने राज्यातील रुग्णालयीन व्यवस्थांवर आणि या रुग्णालयांच्या माध्यमातून आकारल्या जाणाऱ्या महागड्या उपचारांबद्दल सर्वसामान्य जनतेमध्ये जो काही एक रोष व्यक्त होत आहे, त्या रोषाची गंभीर दखल राज्य सरकारने घेतली पाहिजे आणि केवळ राज्य सरकारने गंभीर दखल घेऊन चालणार नाही, तर राज्यांमध्ये जी खासगी रुग्णालय आहेत, धर्मादाय रुग्णालय आहेत तसेच जी मोठी सरकारी रुग्णालय आहेत अशा सर्वच रुग्णालयांनी या घटनेतून बोध घेणे गरजेचे आहे.

मुळात जर या प्रश्नाच्या खोलवर जायचे असेल, तर त्याकरता एक गोष्ट गांभीर्याने लक्षात घेतली पाहिजे ती केंद्र सरकारने आणि त्याचबरोबर राज्य सरकारने देखील ती म्हणजे ज्याप्रमाणे भारतीय घटनेने काही मूलभूत अधिकार हे भारतीय नागरिकांना दिलेले आहेत त्या मूलभूत अधिकारांमध्ये रुग्णालयीन उपचाराचा अधिकार हा मूलभूत अधिकार म्हणून समाविष्ट होण्याची नितांत गरज आहे.

भारतीय राज्यघटना ही आपल्याला जगण्याचा मूलभूत अधिकार देते, शिक्षणाचा मूलभूत अधिकार देते, माहिती मिळवण्याचा मूलभूत अधिकार देते, त्याचबरोबर अन्न मिळवण्याचा मूलभूत अधिकार देते, धर्म स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार देते. त्याचबरोबर राईट टू ट्रीटमेंट अर्थात रुग्णालयीन उपचाराचा हक्क हा मूलभूत अधिकार म्हणून समाविष्ट होणे ही या पुढच्या काळाची खरी गरज आहे. दोनच वर्षांपूर्वी आपण कोविडसारख्या जीवघेण्या साथीचा अनुभव घेतला आहे आणि त्यामध्ये जे काही जीव गेले तेही पाहिले आहेत. हे जर सर्व लक्षात घेतलं तर या पुढच्या काळात जगात देशात आणि राज्यात आरोग्याबाबत कधीही आणीबाणीसारखी परिस्थिती उद्भवू शकते हे लक्षात घेऊन त्या दृष्टीने केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांनी याआधीच त्यासाठी सज्ज राहिले पाहिजे.

रुग्णालयीन उपचारांचा अधिकार हा जर का मूलभूत अधिकार म्हणून समाविष्ट झाला, तर त्याचा रुग्णाला मोठ्या प्रमाणावर फायदा होईलच मात्र त्याचबरोबर आरोग्य व्यवस्थेमध्ये जी काही एक अनागोंदी आहे. या अनागोंदीला नियंत्रणात आणणे, चाप लावणे हे देखील केंद्र आणि राज्य सरकारला शक्य होणार आहे. राज्यात आणि देशभरात जी खासगी रुग्णालय दिवसेंदिवस फोफावत आहेत त्यांच्यावर देखील कोठेतरी केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांचे काही प्रमाणात का होईना नियंत्रण असणे हे देखील अत्यंत गरजेचे आहे. पुणे येथील तनिषा भिसे घटनेमध्ये मुख्यमंत्री वैद्यकीय कक्षाने प्रयत्न करून देखील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या व्यवस्थापनाने यातील स्वतःची आडमुठी भूमिका ही कायम ठेवली हे सर्वात दुर्दैवी आहे. जर मुख्यमंत्री वैद्यकीय पक्षाच्या प्रमुखांनी सांगून देखील धर्मदाय रुग्णालय ऐकत नसतील, तर शेवटी सर्वसामान्य जनतेने अशा संकटकाळात जायचे तरी कोणाकडे हा एक मोठा प्रश्न आहे.

याबरोबरच एक आणखीन महत्त्वाची गोष्ट लक्षात घेण्याची गरज आहे ती म्हणजे ज्याप्रमाणे रुग्णाच्या उपचाराचा हक्क हा मूलभूत हक्क म्हणून त्याला स्थान मिळावे असे एकीकडे म्हणत असताना दुसरीकडे रुग्णांच्या उपचारासाठी रुग्णालयांना जो काही खर्च येतो त्यासाठी जर प्रत्येक नागरिकाला आरोग्य विमा बंधनकारक आणि सक्तीचा केला, तर त्या माध्यमातून देखील रुग्णालयांना भेडसावणाऱ्या अडचणीवर देखील मात होऊ शकेल आणि त्याचबरोबर रुग्णांवरती दर्जेदार उपचार देखील होऊ शकतील. जर राज्य सरकार राज्यातील शेतकऱ्यांसाठी एक रुपयात पीक विमा योजना आणू शकते आणि त्याची यशस्वी अंमलबजावणी करू शकते तर राज्यातील नागरिकांसाठी अशी एक प्रोत्साहनात्मक आरोग्य विमा योजना राज्य सरकार का आणू शकत नाही याचाही विचार राज्याच्या आरोग्य खात्याने तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्राधान्याने करण्याची गरज आहे. अर्थात यामध्ये केंद्र सरकारची आयुष्यमान भारत योजना आहे. तसेच राज्य सरकारची महात्मा फुले आरोग्यदायी योजना आहे.

या दोन योजना या प्रामुख्याने सरकारी रुग्णालयांमध्ये आणि त्याचबरोबर जी रुग्णालय या योजना राबू इच्छितात अशा खाजगी रुग्णालयांमध्ये या दोन्ही योजना कार्यान्वित आहेत यात संशयच नाही. यामध्ये पाच लाखांपर्यंतचे उपचार हे या दोन्ही योजनांच्या माध्यमातून मोफत केले जातात आणि त्याचा आजवर राज्यातील लाखो गरजू रुग्णांनी लाभ देखील करून घेतलेला आहे हे देखील नाकारण्याचे काही कारण नाही. तथापि याबरोबरच जर रुग्णांनी उपचार नेमके कोठे घ्यावेत? सरकारी रुग्णालयामध्ये घ्यावेत की खासगी रुग्णालयातून या दोन्ही योजनांचा लाभ घेऊन त्याद्वारे घ्यावेत की, मग बड्या नामांकित रुग्णालयांमध्ये घ्यावेत असे स्वातंत्र्य जरी रुग्णाला असले तरी शेवटी हे त्याच्या आर्थिक स्थितीवर अवलंबून असते आणि अशावेळी जर किमान पाच लाखांपर्यंतचे आरोग्य विमा कवच प्रत्येक नागरिकाला त्याच्या रुग्णालयीन उपचारांसाठी उपलब्ध होऊ शकले तर पैसे नाहीत म्हणून रुग्णांवरती उपचारच नाकारण्याचा प्रकार किमान यापुढे तरी कोणत्याही रुग्णालयांमध्ये घडणार नाही.

अर्थात तनिषा भिसे घटनेनंतर पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने जे निवेदन प्रसिद्ध केले आहे. त्यामध्ये रुग्णालय प्रशासनाने एक मोठा निर्णय घेतला आहे की, ज्यामध्ये आता यापुढे कोणत्याही रुग्णावर उपचार करण्यापूर्वी त्याच्याकडून कोणतीही अनामत रक्कम घेतली जाणार नसल्याचे रुग्णालयाने स्पष्ट केले आहे. पण हा निर्णय घेण्यासाठी देखील तनिषा भिसे यांचा दुर्दैवी मृत्यू व्हावा लागला हे देखील अत्यंत खेदजनक आहे. आणि यासाठी राज्य सरकारने तत्काळ राज्यातील सर्व खासगी , कॉर्पोरेट्स त्याचप्रमाणे धर्मादाय रुग्णालयांना लेखी आदेश देऊन कोणत्याही रुग्णाकडे अथवा रुग्णाच्या नातेवाईकांकडे रुग्णालयात दाखल करण्यासाठी पैसे नाहीत म्हणून रुग्णावर त्यावेळी उपचार नाकारण्यात येऊ नयेत अशी स्पष्ट तंबी देण्याची नितांत गरज आहे. आणि या सर्वांबरोबरच सर्वात महत्त्वाचे म्हणजे ज्याप्रमाणे सरकारी रुग्णालयांमधील उपचाराचे दर हे निश्चित केलेले असतात त्याचप्रमाणे राज्यामध्ये खासगी व अन्य रुग्णालयांमधील उपचारांचे दर हे हॉस्पिटल निहाय जर राज्य सरकारने निश्चित करून दिले तर कोणत्याही हॉस्पिटलमध्ये उद्या कोणताही रुग्ण जर उपचारासाठी गेला तर त्याला असलेल्या आजारानुसार आणि त्यावर कराव्या लागणाऱ्या उपचारानुसार त्याला किती खर्च येऊ शकतो याचा एक अंदाज हा निश्चितच रुग्णाला तसेच रुग्णाच्या नातेवाईकांना देखील आधी येऊ शकेल की ज्यामुळे त्यांना कोणत्या रुग्णालयात उपचार घेणे शक्य आहे हे ठरवता येईल.

पुण्यातील या दुर्दैवी घटनेच्या निमित्ताने राज्य सरकारने आरोग्य क्षेत्रात जर खरोखरच तळमळीने काम केले आणि काही धोरणात्मक बदल केले, तर निश्चितच आगामी काळात रुग्णालये आणि रुग्णालयीन उपचार यावरून रुग्ण आणि रुग्णालयीन व्यवस्थापन यांच्यात उद्भवणारे वाद, निष्पाप जाणारे जीव हे निश्चितच टाळता येऊ शकतील.

# पिंपरी शिवारातील शेतकऱ्याची चंदनाची झाडे कापली; पोलिसांकडून तक्रार स्वीकारण्यास नकार



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील मौजे पिंपरी येथील रामसिंग सांडू बेडवाल या शेतकऱ्याच्या गट क्रमांक ९१ मधील शेतजमिनीत मध्यरात्री चंदनाच्या झाडांची चोरी झाली आहे. अज्ञात चोरट्यांनी ३ चंदनाच्या झाडांचे गाभे काढून नेले असून, उर्वरित १५ झाडांवर कुऱ्हाडीने आघात करून त्यांना जखमी करण्यात आले आहे.ही घटना दिनांक ६ एप्रिलच्या मध्यरात्री १२ ते ४ वाजेच्या दरम्यान घडली असून, सकाळी ९ वाजता ही घटना उघडकीस आली. रामसिंग बेडवाल यांनी यासंदर्भात खुलताबाद पोलीस स्टेशनमध्ये तक्रार देण्यासाठी प्रयत्न केला. मात्र, तक्रार स्वीकारण्यास पोलीस अधिकाऱ्यांनी नकार दिल्याचा आरोप त्यांनी केला आहे.या प्रकारा मुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट असून, पीडित शेतकरी लवकरच ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करणार असल्याचे त्यांनी सांगितले.स्थानिक प्रशासन व पोलिसांनी या प्रकरणी तत्काळ दखल घेऊन अज्ञात चोरट्यांविरोधात कठोर कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान खुलताबाद पोलिसांत तक्रार घेत नसल्यामुळे ग्रामीण पोलिस अधीक्षक यांच्या कडे तक्रार करण्याचा इशारा दिला आहे..

# !!! सूर्यनारायणाचा वाढता प्रकोप, सावधान !!!

**उन्हाळ्यातील कडक ऊन त्वचेसाठी खूप हानिकारक आहे. सूर्याच्या तीव्र किरणांमुळे आपल्या त्वचेला सनबर्न, टॅनिंग आणि मुरुमांसारख्या समस्या उद्भवू लागतात. उन्हामुळे आपला चेहराही कोरडा आणि निर्जीव दिसू लागतो. यंदा सन २०२५ साली खुप कडक उन्हाळा असण्याची लक्षणे दिसू लागली आहेत. वाटते की सूर्यनारायण आग ओकत आहे की काय? त्यामुळे आपणच आपली काळजी घेणे इष्ट ठरणार आहे. खबरदारीचा इशारा देणारा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर लेख सेवेत...**

यावर्षी एवढे भयंकर कडक ऊन पडत आहे. झाडांची कोवळी-ओली-हिरवी पाने दुपारी चिंबलेली दिसत आहेत. ऊन्हात फिरल्यास ऊन्हाचे असह्य चटके बसत आहेत. मागील मार्च महिन्यातच असे हाल होते. गर्दीचे रस्ते निर्जन दिसत असत. त्यामुळे स्वतः च्या आरोग्याची चिंता प्रत्येकांनी स्वतःच घेणे अत्यावश्यक वाटत आहे. आता एप्रिल अखेर आणि मे महिन्यातील तापमानाची तीव्रता यंदा मार्च महिन्यापासूनच जाणवायला लागली. तापमानाने चाळीशी पार केली असून राज्यात उष्णतेची लाट भडकली आहे. अधेमध्ये अवकाळी पाऊसही धुमाकूळ घालत आहे, मात्र उष्णता नावालाच कमी होत आहे. उष्माघात म्हणजे उष्णतेचा आघात होय. इंग्रजीत त्याला सनस्ट्रोक म्हणतात. या व्याधीत सुरुवातीला चक्कर, डोकेदुखी, मळमळ-उलटी, पोटात वेदना, गोंधळलेली अवस्था ही सामान्य लक्षणे रुग्णामध्ये पहायला मिळतात. याकडे दुर्लक्ष केल्यास जीवही गमवावा लागतो. जास्त वेळ उन्हात काम केल्याने शारीरिक समस्या निर्माण होऊ शकते. त्यातील गंभीर प्रकार म्हणजे उष्माघात- हिट एक्झॉशन आणि उष्माघात- हिट स्ट्रोक होय. सतत कडाक्याच्या उन्हात काम केल्यानंतर उष्माघात होतो. त्यातून होणारी तीव्र समस्या म्हणजेच उष्माघात होय. शरीराने मर्यादेपेक्षा जास्त उष्णता निर्माण केली किंवा उष्णता शोषून घेतली तर हायपरथर्मिया म्हणजेच अतिउच्च तापमानाचा आजार होतो. उष्माघात हा त्याचाच एक प्रकार आहे. बाहेरचे तापमान प्रमाणाबाहेर वाढले की शरीरातील तापमान नियंत्रित करण्याची यंत्रणा कोलमडते. ऊन आणि गरम हवेच्या झोतामध्ये काम करावे लागले किंवा तीव्र उष्णतेच्या संपर्कात गेल्यास शरीरातील तापमान नियंत्रित करणारी हायपोथॅलॅमसमधील यंत्रणा कोलमडून पडते आणि उष्माघात होतो. उष्माघात होण्याचे नेमके कारण म्हणजे शरीरातून बाहेर पडणाऱ्या उष्णतेहून शोषलेली उष्णता अधिक असते. यामुळे शरीराचे तापमान वाढते. उष्माघात झाल्यानंतर तातडीची वैद्यकीय सेवा मिळाली नाही तर मृत्यू ओढवतो. उष्माघात आणि ताप येणे या भिन्न प्रक्रिया आहेत. ताप येण्यामध्ये शरीराचे तापमान नेहमीहून अधिक राहते. व्याख्येप्रमाणे उष्माघात म्हणजे शरीराचे तापमान ३८.१ पेक्षा अधिक किंवा त्याहून अधिक तापमानाला स्थिर राहणे. सामान्यपणे दुपारी शरीराचे तापमान ३७.७० सेल्सिअस असते. उष्माघातामध्ये हे तापमान ४० सेल्सिअस होऊन ते जीवघेणे ठरते. जास्त तापमानामुळे शरीरातील महत्त्वाचे अवयव निकामी होतात. उष्माघात हा प्रामुख्याने अर्भकं, लहान मुलं, वयोवृद्ध, पाणी कमी पिणारे लोक, दीर्घ आजारी किंवा मद्यप्राशन करणाऱ्यांमध्ये आढळतो.

तसेच ह्दयरोग, फुप्फुसांचे आजार, मूत्रपिंडाचे आजार, लठ्ठपणा, उच्च रक्तदाब, मधुमेह, मानसिक व्याधीसारख्या आजारांनी त्रस्त व्यक्तींनाही सहज उष्माघात होऊ शकतो. खेळाडूंना आणि बराच वेळ आउटडोअर काम करणाऱ्यांना उष्माघात होऊ शकतो. उष्म घाताची कारणे- अधिक प्रमाणात जंक फूड खाणे, आपल्याला घराबाहेर पडताच काहीतरी खायची इच्छा होते. उन्हात तर बाहेरचे अधिकच खात असतो. यामध्ये जंक फूडचे प्रमाण अधिक असते. यामुळे उष्माघात आणि उष्मा, थकवा देखील होऊ शकतो. काही जंक फूडमध्ये मोनोसोडियम, ग्लूटामंट्ससह गरम आणि हानिकारक पदार्थ असतात. याचे सेवन केल्याने शरीरातील उष्णता वाढवते. ज्यामुळे शरीर उष्माघाताचा सामना करू शकत नाही. शरीरातील पाण्याचा अभाव हे उष्माघाताचे एक प्रमुख कारण समजले जाते.

उन्हाळ्यात डिहायड्रेशनची अनेक प्रकरणे पाहिली जातात. भर उन्हात कमी पाणी पिऊन घराबाहेर पडले तर उष्माघात तर होईलच तसेच पाण्याच्या अभावामुळे होणाऱ्या अनेक रोगांचाही आपल्याला सामना करावा लागू शकतो. अशा परिस्थितीत नारळ पाण्याचे सेवन नक्की केले पाहिजे. आपल्याला कोणत्या ना कोणत्या कारणाने भर उन्हात बाहेर पडावेच लागते. सूर्याची तीव्र किरणे तोंड आणि शरीराच्या इतर भागांना स्पर्श करतात, तेव्हा उष्माघात होण्याची शक्यता जास्त असते. कामानिमित्त बाहेर निघाल्याने आपल्याला हे सर्व सोसावे लागते. उष्णता टाळण्यासाठी डोके, तोंड आणि हात हलक्या कपड्याने झाकून ठेवावे. शक्य असल्यास छत्रीसह घराबाहेर पडलेले बरे. आपणास थायरॉईडची समस्या असेल तर उन्हात उष्माघात होण्याची शक्यता जास्त असते. थायरॉईड असमतोल झाल्यावर रक्तदाब बदलल्यास थकवा जाणवतो. अशा परिस्थितीत उन्हात जाणे टाळावे. उष्माघाताची लक्षणे- उच्च ताप, कमी रक्तदाब, चक्कर येणे, उलट्या होणे, स्नायूंमध्ये कडकपणा, सतत घाम येणे, अशक्तपणा, त्वचेवर पुरळ, बेहोश होणे, डोकेदुखी, श्वास घेण्यास समस्या, भीती आणि अस्वस्थता.

उष्माघातापासून बचाव असा करावा- उन्हात बाहेर निघणे टाळावे, उन्हात बाहेर पडताना छत्री वापरावी, उन्हाळ्यात चहा-कॉफी किंवा गरम पदार्थ टाळावे, शरीरात तापमान सामान्य राखण्यासाठी पाण्याची कमतरता येऊ देऊ नये, दिवसातून दोन ते तीन लीटर पाणी प्यावे, दीर्घकालीन काम टाळावे, उष्माघात झाल्यास डॉक्टरांना भेटावे, साखर असलेले पेय पिणे टाळावे, खुले व हलके कपडे घालावे, बाहेर पडण्यापूर्वी सनस्क्रीन आणि सनग्लासेस वापरावे, संतुलित आणि पौष्टिक आहार घ्यावे, जेव्हा तीव्र सूर्यप्रकाश असेल तेव्हा व्यायाम किंवा सायकल चालविणे टाळावे. अशाप्रकारे आग ओकणाऱ्या सूर्यनारायणाच्या प्रकोपापासून आपण वाचू शकतो. अन्यथा बळी पडू यात मुळीच शंका नाही! !! रखरखीत उन्हाळ्याच्या सावधगिरीच्या इशाऱ्यासह गरमागरम हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**- श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**

# शेअर बाजार घसरला, सिलेंडर महागला; पेट्रोल आणि डिझेलवरील अबकारी कर वाढला

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

अमेरिकेने भारतासह जगातील अनेक देशांमधून आयात केल्या जाणाऱ्या मालावर टॅरिफ लागू केला आहे. या निर्णयाचा जगभरातील शेअर बाजारांवर प्रतिकूल परिणाम झाला. अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया ८५ रुपये ८२ पैशांवर पोहोचला आहे. सेन्सेक्स २२२६.७९ अंकांनी घसरून ७३,१३७.९० आणि निफ्टी ७४२.८५ अंकांनी घसरून २२,१६१.६० वर पोहोचला. टॅरिफबाबत अमेरिकेने घेतलेल्या निर्णयांनंतर अनेक देशांच्या शेअर बाजारांमध्ये घट झाली. पाठोपाठ भारतात पेट्रोल आणि डिझेलवरील अबकारी कर वाढवण्यात आला. तसेच भारतात घरगुती वापराचा एलपीजी सिलेंडर महाग झाला.

**पेट्रोल आणि डिझेलवरील अबकारी कर वाढला**

केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील प्रति लिटर अबकारी कर (एक्साईज ड्युटी) प्रत्येकी दोन रुपयांनी वाढवला आहे. या निर्णयामुळे मंगळवार ८ एप्रिलपासून पेट्रोलचे उत्पादन शुल्क १३ रुपये प्रति लिटर आणि डिझेलचे उत्पादन शुल्क १० रुपये प्रति लिटर झाले आहे. अबकारी करात वाढ झाली तरी पेट्रोल आणि डिझेलच्या ग्राहकांसाठीच्या विक्रीच्या दरात वाढ होणार आहे की हा भार तेल कंपन्या सोसणार आहेत, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. काही काळ आंतरराष्ट्रीय बाजारात तेल स्वस्त होते. या काळात तेल कंपन्यांनी दरात कोणताही बदल केला नव्हता. यामुळे करवाढीचा भार कंपन्यांवर टाकला जाण्याची शक्यता आहे. याबाबतचे नेमके चित्र रात्रीपर्यंत स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

**एलपीजी ५० रुपयांनी महागला** - घरात स्वयंपाक करण्यासाठी वापरला जाणारा एलपीजी सिलेंडर ५० रुपयांनी महागला आहे. उज्ज्वला गॅस योजनेच्या अंतर्गत ५०३ रुपयांना मिळणारा सिलेंडर ५५३ रुपयांना मिळणार आहे. उज्ज्वला योजनेत नसलेल्यांसाठी आधी एलपीजी सिलेंडर ८०३ रुपयांत उपलब्ध होता. आता हा सिलेंडर ८५३ रुपयांत मिळणार आहे. ही दरवाढ मंगळवार ८ एप्रिलपासून लागू होणार आहे.

**गॅसच्या दरात वाढ** - दिल्ली आणि आसपासच्या शहरांमध्ये गॅसचा पुरवठा करणाऱ्या इंद्रप्रस्थ गॅस लिमिटेड कंपनीने गॅसच्या दरात वाढ केली आहे. दिल्लीत सीएनजीच्या किमतीत १ रुपयांची वाढ झाली आहे, तर इतर ठिकाणी ३ रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. आयजीएल दिल्लीमध्ये सुमारे ७० टक्के गॅस विकते, तर उर्वरित ३० टक्के गॅस इतर कंपन्यांचा आहे. सीएनजीच्या किमतीत झालेल्या या वाढीनंतर आता दिल्लीत सीएनजीची किंमत ७६.०९ रुपये झाली आहे आणि नोएडा-गाझियाबादमध्ये सीएनजी ८४.७० रुपये प्रति किलो झाला आहे. मुंबईत सीएनजी ७७ रुपये किलो दराने विकला जात आहे.

**टॅरिफच्या निर्णयाचा शेअर बाजारावर प्रतिकूल परिणाम** - टॅरिफबाबत अमेरिकेने घेतलेल्या निर्णयांनंतर अनेक देशांच्या शेअर बाजारांमध्ये घट झाल्याचे दिसून आले. या पार्श्वभूमीवर प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी प्रतिक्रिया मागितली असता, टॅम्प यांनी चकीत करणारी प्रतिक्रिया दिली. मला काहीही बिघडू द्यायचे नाही. पण काही वेळा आजारावर उपचार करण्यासाठी दिलेल्या औषधांचा सुरुवातीला प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असते; असे ट्रम्प म्हणाले. जगभर फार्मा, आयटी आणि ऑटो क्षेत्रातील शेअरमध्ये मोठ्या प्रमाणात घसरण झाली आहे.

अमेरिकेत डाऊ जोन्स १.८९ टक्के, एस अँड पी ५०० ५.९७ टक्के, नॅसडॅक ५.७३ टक्के घसरला. युरोपचे शेअर बाजार तीन ते चार टक्क्यांनी घसरले आहेत. जपानचा निक्केई ८.४९ टक्के, हाँगकाँगचा शेअर बाजार १५.२४ टक्के, तैवानचा शेअर बाजार १०.७४ टक्के आणि शांघायचा शेअर बाजार ७.९३ टक्क्यांनी घसरला आहे. टॅरिफमुळे अमेरिकेत महागाई वाढेल. अमेरिकेसह जगभर मंदीची लाट येईल, अशी भीती तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. तज्ज्ञांनी व्यक्त केलेल्या या भीतीचाही शेअर बाजारावर परिणाम झाला आहे.

# महावीर जयंती निमित्त निशुल्क सुवर्ण प्राशन शिबिरास प्रतिसाद



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

अग्रवाल दिगंबर जैन मंदिर सराफा तसेच स्वर्गीय मगनसा रूपचंदसा साहूजी यांच्या स्मरणार्थ आयोजित निशुल्क सुवर्ण प्राशन शिबिरास उत्तम प्रतिसाद दिला.१५० बालकांनी लाभ घेतला.भगवान महावीर जयती निमित्त

श्रीमताबाई हिरासा साहूजी त्यागी भवन सराफा येथे कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून लक्ष्मीनारायण बाखरिया, पप्पू व्यास, स्वप्नील पारख, सारिका साहूजी, विलास साहूजी, प्रतीक साहूजी, पंकज साकला, निलेश जैन मुकेश साहूजी,बाहुबली वायकोस, संजय साहूजी,सुधीर साहूजी, प्रशांत शहा यांच्या हस्ते उद्घाटन झाले. डॉ.भावना साहूजी,तसेच रुचिता साहुजी यांनी सलग तीन वर्षीय शिबिर उपक्रमाचा आढावा घेऊन बालकांना होणारे प्रकृतीचे लाभ सांगितले.

प्रकल्प प्रमुख म्हणून डॉ.भावना रजत साहूजी, आयुष्य साहूजी, रीता संजय साहूजी यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन मुकेश साहुजी यांनी केले. प्रारंभी हर्षल साहूजी, नवदीप साहूजी, सागर साहूजी, अभय साहूजी, ज्योती संजय साहुजी आदींनी मान्यवरांचे स्वागत केले यावेळी अनुराग साहूजी, अमृत साहूजी, दिवाकर साहुजी, सचिन साहूजी, मीनल बागरेचा, बनकर,कासलीवाल, पाटणी आदी आदींसह समाज बांधव, महिला व बालकांची उपस्थिती होती. अशी माहिती प्रशांत शहा नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यांनी दिली.

२५ साल बेमिसाल

# छत्रपती संभाजीनगर तालुका;सरपंचपदाचे आरक्षण सोडत बुधवारी(दि.९)

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

ग्रामविकास विभाग महाराष्ट्र राज्य आणि राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील सरपंचपदाच्या आरक्षणाची तारीख बुधवार दि. ९ एप्रिल २०२५ निश्चित करण्यात आली आहे. मौलाना आझाद संशोधन केंद्र, एन-१०, सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे बुधवार दि.९ रोजी

सकाळी ११ वाजता आरक्षण सोडत होणार आहे. ही आरक्षण सोडत एप्रिल २०२५ ते मार्च २०३० या पाच वर्षांसाठी एकूण ११५ ग्राम पंचायतीसाठी होणार आहे. सरपंच आणि उपसरपंच निवडणूक नियम १९६४ च्या नियम (३) (४) नुसार हे आरक्षण काढण्यात येणार आहे.

तालुक्यातील सर्व नागरिकांनी या जाहीर प्रकटनाद्वारे सरपंच पदाचे आरक्षण काढण्यासाठी वरील ठिकाणी, तारखेला आणि ठरलेल्या वेळेत सभागृहात उपस्थित राहावे. असे आवाहन तहसीलदार छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# लोकशाही दिनी २९ अर्ज प्राप्त

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिल्हास्तरीय लोकशाही दिनी जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी (दि.७) पार पडला. यावेळी २९ तक्रारी अर्ज प्राप्त झाले. जिल्हा परिषद -१ अर्ज, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग १, पोलीस विभाग-२, महसूल विभाग-४, पुरवठा विभाग- १, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था-१ व इतर साधे निवेदन १९ असे एकूण २९ अर्ज प्राप्त झाले, अशी माहिती सामान्य प्रशासन विभागातून देण्यात आली.

# जिल्हाधिकारी तहसिलच्या दारी शिधापत्रिका, अर्थसहाय्य योजना, प्रलंबित जमिन मोजणी;असे अनेक प्रश्न तात्काळ निकाली

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जिल्हाधिकारी तहसिलच्या दारी या उपक्रमामुळे आज अनेक नागरिकांचे तात्काळ प्रश्न निकाली निघाले. त्यात प्रामुख्याने शिधापत्रिका, सामाजिक अर्थसहाय्य योजना, जमिनीच्या मोजणीचे प्रलंबित प्रकरणे,फेरफार प्रकरणेशा एक ना अनेक समस्या निकाली काढण्यात आल्या. अनेक प्रकरणांमध्ये ई केवायसी प्रलंबित असल्याने लाभार्थ्यांना लाभ मिळण्यात विलंब होत आहे. त्यासाठी संबंधितांनी आपले ई- केवायसी लगेचच करुन घ्यावे,असे आवाहनही जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

जिल्हाधिकारी तहसिलच्या दारी या उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज तहसील कचेरी येथे आलेल्या अभ्यागतांना दुरदृष्य प्रणालीद्वारे संवाद साधला.




सिल्लोड तालुक्यातील सदाशिव बिरगे रा. शिरसाखेडा यांच्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे अनुदान प्रलंबित होते. त्यासाठी ई-केवायसी झालेले नव्हते. ते झाल्यास लगेच खात्यात परस्पर पैसे जमा होतील असे सांगण्यात आले. तसेच लिलाबाई कांबळे, कमलाबाई लोखंडे यांच्या शिधापत्रिकांचा प्रश्न होता. त्यांना आजच शिधापत्रिका देण्यात आल्या. घाटनांद्रा येथील अमोल मोरे यांच्या सातबारा उताऱ्यावर दिसणारा बँक कर्जाचा बोजा कमी करावयाचा आहे, त्यासाठी तहसिलदार यांनी तात्काळ कारवाई करावी,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. खुलताबाद येथील सुनिल जाधव रा. कवीटखेडा यांच्या शिधापत्रिकेचा प्रश्नही लगेचच निकाली काढण्यात आला. फुलंब्री तालुक्यातील आळंद येथील समीर पठाण यांच्या तुकडेबंदी अंतर्गत जमिन मोजणीसंदर्भात आजच पत्र देण्यात आले. हा प्रश्न गेल्या ७ वर्षांपासून प्रलंबित होता. तेथीलच जनाबाई देवकर यांचे संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान ईकेवायसी अभावी रखडले असून त्यांचेही तात्काळ ई-केवायसी करावे असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. हरसूल येथील फेरफार प्रलंबित प्रकरणी तलाठ्याची चौकशी करुन आठवड्यात निकाल द्यावा,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, लोकांना जिल्हाधिकारी कार्यालयात येण्याचे कष्ट घ्यावे लागू नये तसेच त्यांचा खर्च व वेळ वाचावा म्हणून हा उपक्रम सुरु केला आहे. लोकांनी जिल्हाधिकारी कार्यालयात न येता आपल्या तक्रारी, निवेदने हे तहसिलदार कचेरीत दर सोमवार व गुरुवारी सादर करावे.

अपर जिल्हाधिकारी प्रवीण फुलारी, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर हे मुख्यालयातून तर सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार व नागरिक हे दूरदृष्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

## देवगिरी महाविद्यालयात एम.बी.ए. विभागाच्या वतीने डॉ. साद सिद्दीकी यांचे 'मानव संसाधन क्षेत्रातील नव-कलाटणी व नविन भरती होणाऱ्या उमेदवारांकडून असलेल्या अपेक्षा' या विषयावर अतिथी व्याख्यान

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील एम.बी.ए. विभागाच्या वतीने दिनांक ४ एप्रिल २०२५ रोजी डॉ. साद सिद्दीकी यांचे 'मानव संसाधन क्षेत्रातील नव–कलाटणी व नविन भरती होणाऱ्या उमेदवारांकडून असलेल्या अपेक्षा' या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

या व्याख्यानात त्यांनी एचआर क्षेत्रातील सध्याचे बदल, कंपन्यांची नवीन धोरणे, उद्योगक्षेत्रातील गरजा, आणि नविन उमेदवारांकडून असलेल्या अपेक्षांवर सविस्तर माहिती दिली. त्यांनी मुलाखतीची तयारी, व्यक्तिमत्व विकास, आणि सॉफ्ट स्किल्सच्या महत्त्वावरही



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. सिद्दीकी यांनी त्यांच्या व्याख्यानातून उद्योगातील वास्तव परिस्थिती, नोकरी मिळवण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये, आणि कठ क्षेत्रात निर्माण होणाऱ्या संधी यांचा अभ्यासपूर्ण वेध घेतला. या व्याख्यानाच्या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर, उपप्राचार्य डॉ. रवी पाटील, एम.बी.ए. विभागाच्या समन्वयक प्रा.सबिहा शेख, विभागप्रमुख प्रा. प्रदीप गिऱ्हे, तसेच विभागातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. वर्षा करडखेडकर यांनी केले. श्री. शुभम पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला, तर डॉ. प्रद्युम्न शास्त्री यांनी आभार प्रदर्शन केले. या व्याख्यानाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. उपस्थित विद्यार्थ्यांना उद्योगजगतातील कठ संबंधित ज्ञान व मार्गदर्शन मिळाल्याने त्यांच्यातील आत्मविश्वास व भविष्याच्या तयारीला अधिक बळकटी मिळाली.

## प्रभूरामचंद्राची आदर्श पुत्र, भाऊ,पती,पिता,शिष्य आणि आदर्श राजा ही प्रतिमा प्रत्येक भारतीयांच्या मनात ठसलेली आहे-राजीव जहागिरदार

### राम बहुउद्देशीय शिक्षण संस्थेतर्फे देवानगरीत श्रीरामनवमी उत्सव संपन्न

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आई वडीलांच्या आज्ञेचा स्विकार करुन आयोध्येचे राज्य मिळणार नाही ही बाब लक्षात घेऊन भर तारुण्यात प्रभू रामचंद्र सीतामाई व बंधू लक्ष्मणासह १४ वर्ष वनवासाला गेले. यातून त्यांची मातृ-पितृ भक्ती लक्षात येते. याशिवाय प्रभूरामचंद्रांमध्ये प्रामुख्याने धैर्यवान, साहसी, न्यायीराजा, उदार, चारित्र्यवान, कृतज्ञ सत्यवादी, सहनशील, कुशल योद्धा व दृढ प्रतिज्ञा हे पण गुण पाहायला मिळतात अशी माहिति विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयाम देवगिरी प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार यांनी दिली ते राम बहुउद्देशीय शिक्षण संस्थेतर्फे आयोजित श्रीराम जन्मोत्सव कार्यक्रमात बोलत होते या यावेळी व्यासपीठावर संस्थेचे




अध्यक्ष मिलिंद खोडे, जगदीश लोणीकर बाबुराव नालमवार प्रेम खडकीकर आणि जयस्वाल काका उपस्थित होते. यावेळी बोलताना श्री जहागिरदार पुढे म्हणाले प्रभू श्री रामचंद्र यांचा एक आदर्श पुत्र आदर्श भाऊ आदर्श पती आदर्श पिता आदर्श शिष्य आदर्श राजा म्हणून केलेल्या आदर्श घेऊन आपण आपले दैनंदिन काम केल्यास भारताची सांस्कृतिक प्रतिमा सर्व जगभर उंचावल्याशिवाय राहणार नाही. हनुमंताला ज्याप्रमाणे आपल्या पराक्रमाचे विस्मरण झाले होते.

जांबुवंताने हनुमंताला त्यांनी केलेल्या पराक्रमाचे स्मरण करून दिल्यानंतर हनुमंताने विराट रूप धारण करून शतयोजने पसरलेला सागर उल्लंघून लंकेत प्रवेश केला त्याप्रमाणे सद्यस्थितीत हिंदू समाजाला त्यांच्या पूर्वजांनी केलेल्या पराक्रमाची आठवण करून देण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

आई-वडिलांचे आज्ञेवरून प्रभू रामचंद्र चौदा वर्ष वनवासात होते पण बाबराचा सेनापती मीर बाकी यांनी अयोध्येतील मंदिरावर हल्ला करून तेथे बाबरी मज्जिद बांधली तेव्हापासून २१ जानेवारी २०२४ पर्यंत म्हणजेच ४९६ वर्ष प्रभूश्रीराम यांना पुनश्च वनवास पत्करावा लागला. देशातील लाखो हिंदूंनी एकत्र येऊन ६ डिसेंबर १९९२ ला आपला पराक्रम दाखवून दिला. अयोध्येतील बाबरी ढाच्या पूर्णपणे उध्वस्त केला.उच्च न्यायालयाने विविध पुराव्यांच्या आधारे हिंदूंच्या बाजूने निकाल दिला आणि २२ जानेवारी २०२४ ला अयोध्येत बालरूपातील श्रीराम भव्य मंदिरात विराजमान झाले ही आमच्या पिढीसाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. यावेळी श्री बाबुरावजी नालमवार श्री प्रेम खडकीकर यांनी आपले विचार व्यक्त केले जगदीश लोणीकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

कार्यक्रमाला संस्थेच्या सचिव मृणाल खोडे पूर्णानंद शिरसाठ ललित देशमुख अमोल ठाकूर गौतम यादव राहुल नळदुर्गकर संतोष जोशी सह राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि परिवारातील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वात शेवटी श्री.प्रभुरामाची आरती आणि प्रसाद वाटप होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

## केंद्र, राज्य शासनान दारू वर बंदी आणु शकत नाही कारण ते राजस्वाची दुपती गाय आहे मग प्राशन करणाऱ्यांच्या आरोग्याची दखल शासन घेणार का-बागडे !

**नागपूर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

केन्द्र,राज्य शासनाच्या तिजोरीत सर्वात जास्त महसूल कोणी जमा करत असेल तर तो फक्त मद्य घेणारे आहेत कारण की गाव तिथे बस असते त्याच धर्तीवर गाव तिथे दारू दुकान आहे हे शासनाचे धोरण आहे मद्यप्राशन करणारे हे शासनाचे मित्र आहेत परंतु हा मित्र शासनाच्या आरोग्याच्या सुविधा पासून वंचित आहे याला घरापासून तर त्यतेक जागी हा अपमानास्पद वागणूकाचा बळी आहे शासनाच्या गाव तिथे दारू दुकान यांच्या तो बळी पडला आहे या मुळे देशातील आणि राज्यातील साठ ते सत्तर टक्के लोकांना लिव्हर आजारांनी ग्रस्त केले आहे या महसूल योद्धांचा साठी शासनाने काय आर्थिक प्रावधान केले आहे हा सवाल आंरिमोचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी आज केले आहे ते जागतिक आरोग्य दिनानिमित्त मद्यपी आणि त्यांचे देशातील महसूल मध्ये काय योगदान या विषयावर आयोजित संघ



गोष्टी यावर निशाण्यावर तीर मारताना बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मद्यपी ग्राहक तक्रार निवारण समितीचे प्रमुख अतुल गंगापूरकर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून राजीव कांबळे ,रोमी बागडे हे होते बागडे सरांनी एकच प्याला महा नाटकाचे जनक राम गणेश गडकरी यांच्या छायाचित्रावर पुष्पहार अर्पण केले या मद्यपी ग्राहक तक्रार निवारण समितीच्या सदस्यांनी आपल्या भावनांचा पाऊस पडला एकीकडे आम्ही शासनाच्या मद्य धोरणाला अनुसरून त्यांच्या तिजोरीत महसूल जमा मोठ्या प्रमाणात करतो तरी पण पोलीसांना, आरोग्य विभागाच्या,समाज आणि परिवाराच्या रडारवर आहोत या मध्ये आम्हची चुक का झाली हे राज्य करत्यांनी स्पष्ट पणे सांगून मोकळे करावे नाही तर मद्यपी यांच्यावर कडक निर्बंध घालून हे समाजासाठी देशासाठी घातक आहे म्हणून घोषित करावे असे तिरकष दुःख व्यक्त केले

## चिंतामणि रेसीडेंसी बीड बायपास येथे भगवान पुष्पदंत जैन मदिराचा ९ वा वर्धापन दिवस साजरा

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

श्री १००८ पुष्पदंत दिगबर जैन मदिर बीड बाय पास येथे भगवान पुष्पदंत जैन मदिराचा ९ वा वर्धापन दिवस साजरा केला. यावेळी चिंतामणि रेसीडेंसी बीड बायपास येथे पुष्पदंत भगवान याचा १००८ जिनसहसस्त्र नाम वाचुन भगवताचा अभिषेक केला यावेळी पुष्पदंत भगवान विधान महाआरती भक्ति भावाने करण्यात आली यावेळी भगवताची महा शांति धारा सोभाग्य मीत प्रीति अनिल कुमार अशोक कुमार कासलीवाल रक्षासभूवनला मिळाला.

यावेळी अध्यक्ष अमित बाकलीवाल सचिन गोधा अनिल कासलीवाल दीपक कासलीवाल संजय पाटनी



नितेश चूड़ीवाल जितेंद्र पहाडे सचिन बडजाते पारस अजमेरा प्रमोद चुड़ीवाल पवन रावका विकास पाटनी मधुकर खोबरे पारस पांडे तनिष्क गोधा सूचित बाकलीवाल विशाल पहाडे शीतल खोबरे कीर्ति गोधा संगीता अजमेरा नीता पांडे ज्योति गोधा मंगला पाटनीअनिता लोहाडे पुष्पा कासलीवाल आदिची उपस्थिती होति अशी माहिती नरेंद्र अजमेरा पियुश कासलीवाल यानी दिली.

## इलेक्ट्रॉनिक मिडियावरील अफवांवर विश्वास न ठेवता येणारे उत्सव गुण्या गोविंदाने साजरे करा

### उपविभागीय पोलीस अधिकारी - भागवत फुंदे

**वैजापूर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

नजीकच्या काळात येणारे उत्सव श्रीराम नवमी,महावीर जन्म कल्याणक, हनुमान जन्मोत्सव शांतता व सुव्यवस्था राखून गुण्यागोविंदाने साजरे करावे असे आवाहन करून इलेक्ट्रॉनिक मेडियाच्या अफवांकडे लक्ष न देता बंधुभावाने हे उत्सव साजरे करा अशा सूचना उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे यांनी पोलीस स्टेशन मध्ये आयोजित शांतता समिती बैठकित शनिवार (ता,०५)रोजी केले.ते पुढे म्हणाले की,सण व उत्सवातून आपल्या पारंपारिक विधायक व नैतिक मूल्यांची ,संस्कार व संस्कृतीची माहिती मिळते यास्तव सण उत्सव साजरा करून प्रत्येकाने आनंद घ्यावयाचा असतो.प्रास्ताविक पोलीस निरीक्षक श्यामसुंदर कौठाळे यांनी केले.

शहरात दरवर्षी साजरे होणारे उत्सव श्रीराम नवमी,भगवान महावीर जन्म कल्याणक, व श्री,हनुमान जन्मोत्सव कसे साजरे केले जातात या बाबत सविस्तर माहिती शहरातील जेष्ठ नागरिक व समाज कार्यकर्ते तथा सदस्य धोंडीरामसिंह राजपूत यांनी उपस्थिताना दिली.हे सर्व उत्सव दरवर्षी गुण्या-गोविंदाने साजरे होतात असेही राजपूत पुढे म्हणाले.या प्रसंगी श्रीरामनवमी उत्सव समितीचे प्रमुख सुरेश तांबे व समिती सदस्य तसेच संजय बोरनारे, महेश बुणगे, गणेश खैरे, शैलेश चव्हाण, श्री वाघ, गौरव दौडे, अल्ताफ बाबा, सोनू राजपूत, तसेच गाव कामगार पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष राजू आहेर, उपाध्यक्ष अनिल धिवरे, सूर्यकांत मोटे, शंकर कवडे, शिवराम वाघ, नितीन बागुल, प्रभाकर जगताप, ऍड.रोठे, महिला पोलीस पाटील कविता सूर्यवंशी, सविता जगताप (उगले) जयश्री डुकरे, देविका राजपूत, वंदना घायवट, कचरू राजपूत तसेच श्रीरामनवमी उत्सव समितीचे विनायक व्यवहारे, संजय व्यवहारे, सतीश गुरू कुलकर्णी, अशोक शिंदे, संतोष पवार, महावीर जैन, प्रकाश व्यास, निखिल कासलिवाल यांच्यासह मंजुषा ढाकरे, सुनीता साखरे यांची ही उपस्थिती होती शेवटी पो.कॉ. ज्ञानेश्वर मेटे यांनी आभार मानले.

## मुलं संस्कारीत होणे हीच पालकांची खरी संपत्ती - ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड

**जाफ्राबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

सर्व पालकांच्या जीवनातील खरी व शाश्वत संपत्ती ही मुलं असल्याने, त्यांना चांगले व संस्कारीत निर्माण करण्यासाठी आईवडिलांनी स्वत: चांगले वागावे आणि मग मुलांना सांगावे, असे प्रतिपादन ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांनी केले.

जाफ्राबाद तालुक्यातील काळेगाव येथे दरवर्षीप्रमाणे हरिनाम सप्ताह व ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या पाचव्या दिवशीचे कीर्तन सेवेचे पुष्प गुंफतांना डॉ. फड यांनी आई वडिलांचे खरे हित त्यांची मुलं चांगली निर्माण होण्यात असते. मुलांवर होणारे संस्कार महत्त्वाचे असतात. त्यामुळे आईवडिलांनी त्यांच्या आईवडिलांशी, बहिण भावंडांशी, शेजाऱ्या पाजाऱ्यांशी चांगले वागले पाहिजे. चांगले वागण्यासाठी पैसा खर्च करावा लागत नाही तर फक्त ईर्षा, व्देष, मत्सर, अहंकार, काम, क्रोध, या मानवतेच्या




शत्रूंचा त्याग करावा लागतो, असे फड म्हणाले. आईवडिलांकडून होणाऱ्या चुकीच्या वर्तनाचा विपरित परिणाम मुलांवर होत असतो. असा झालेला विपरित परिणाम सहजासहजी दुरूस्त करता येत नाही. मुलं केवळ सांगण्याने घडत नाहीत तर वडिलधाऱ्यांची कृती पाहून त्याचे अनुकरण करीत असतात. म्हणून पालकांनी आधी केले मग सांगीतले असे वागले पाहिजे. कर्तव्यात कसूर करणाऱ्यांच्या भक्तीलाही अर्थ उरत नाही असेही ते म्हणाले. संध्याकाळी ६ ते ८ या दोन तासाच्या किर्तनातून भाविकांना त्यांनी स्वत:चा शोध घेण्यास भाग पाडले. लोक कसेही वागोत आपण चांगलेच वागले पाहिजे अशी उपस्थितांची मानसिकता तयार झाल्याचे किर्तनाअंती जाणवत होते. या कार्यक्रमासाठी परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर सर्व भाविकांना आमरसासह महाप्रसाद देण्यात आला. फड यांचे गावकऱ्यांच्या वतीने शाल श्रीफळ देऊन स्वागत केले. फड यांनी मानधन न घेतल्याने गावकऱ्यांनी आभार मानले.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816